मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**मराठी भाषा विभाग**
# राज्य मराठी विकास संस्था
**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**
**धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६**
संकेतस्थळ www.rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. रामविसं/ प्र.क्र.२१ /६९०/आस्था/२०२३
दि. ८.७.२०२५

**वाचा – १. शासन निर्णय,महिला व बाल विकास विभाग क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दि. १९.६.२०१४**

**आदेश –**

केंद्र शासनाच्या “कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम – २०१३” मधील तरतुदीनुसार, महिला व बालविकास विभाग, शासननिर्णय दि.१९.६.२०१४ ला अनुसरुन, राज्य मराठी विकास संस्थेमध्ये दि.१६.६.२०२३ अन्वये **अंतर्गत तक्रार समितीची** स्थापना करण्यात आलेली आहे. उपरोक्त “अंतर्गत तक्रार समिती” मधील सदस्य श्री. भास्कर बाजड हे नियतवयोमानानुसार दि. ३०.६.२०२४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. श्री. सुशांत देवळेकर यांनी आपल्या पदाचा स्वेच्छेने राजीनामा दिल्यामुळे त्यांना दि. ३०.५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दि.२४.५.२०२५ रोजीपासून त्यांना संस्थेच्या सेवेतून सेवामुक्त करण्यात आले आहे. सबब पुढीलप्रमाणे “अंतर्गत तक्रार समितीमध्ये” खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **अधिकारी/कर्मचारी यांचे नाव** | **पदनाम** | **पद** |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती नेहा शिरीष मोहोड | लघुलेखक | अध्यक्ष |
| २. | श्री. सुरेंद्र सदाशिव वेंगुर्लेकर | रोखपाल | सदस्य |
| ३. | श्रीमती मधुरा महेश गणपुले | लिपिक-टंकलेखक | सदस्य |
| ४. | श्रीमती दक्षता आनंद गायकवाड | लिपिक-टंकलेखक | सदस्य |
| ५. | श्रीमती नमिता कीर | अशासकीय सदस्य, नियामक मंडळ, रा.म.वि.संस्था | अशासकीय सदस्य |
| ६ | श्री.गिरीश पतके | प्रशासकीय अधिकारी | सदस्य-सचिव |

२. या कार्यालयातील कार्यरत महिला कर्मचारी यांना असे कळविण्यात येते की, त्यांनी लैंगिक छळासंदर्भात कोणतीही तक्रार असल्यास ती समितीच्या अध्यक्षा किंवा सदस्य सचिव किंवा अंतर्गत तक्रार समितीच्या नावे सादर करावी.

३. प्रस्तुत तक्रार समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील –

अ) कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम दि.२३ एप्रिल २०१३ रोजी व त्याअंतर्गत दि.९ डिसेंबर २०१३ रोजी नियम केंद्र शासनाने प्रसिद्ध केले आहेत. त्यामधील तरतूदीनुसार महिलांच्या लैंगिक छळवणूकीस आळा घालण्यासाठी व महिला कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

ब) कार्यालयांतर्गत महिला कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण निर्धारित कालावधीत होण्यासाठी प्राप्त तक्रारींची छाननी करणे व तक्रारींच्या अनुषंगाने योग्य त्या प्राधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणे.

क) लैंगिक छळवणूकीसारखे प्रकार टाळण्यासाठी जागृती निर्माण करणे तसेच समितीच्या नियतकालिक बैठका घेऊन सुरक्षित वातावरणाच्या निर्मितीबाबत खात्री करणे.

**(डॉ. शामकांत देवरे)**
संचालक
राज्य मराठी विकास संस्था,मुंबई

प्रत –

१. श्रीमती नेहा मोहोड, लघुलेखक, रा.म.वि.संस्था,मुंबई
२. श्री. सुरेंद्र वेंगुर्लेकर, रोखपाल, रा.म.वि.संस्था, मुंबई
३. श्रीमती मधुरा गणपुले, लिपिक-टंकलेखक,रा.म.वि.संस्था,मुंबई
४. श्रीमती दक्षता गायकवाड, लिपिक-टंकलेखक, रा.म.वि.संस्था,मुंबई
५. श्रीमती नमिता कीर, अंधेरी, मुंबई.
६. श्री. गिरीश पतके, प्रशासकीय अधिकारी (अ.का.), रा.म.वि.संस्था,मुंबई
७. निवडनस्ती.

प्रत माहितीस्तव सादर,

१. मा.सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.